नि.फौ.ख.क्रं. १९४/२०२३
सरकार –वि– राहुल चौधरी व इतर
नि.क्र. २६२

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०९ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–
माझे नाव – अनंता त्र्यंबकराव शेळके,
वय ४० वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – भोनगाव, ता. शेगांव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकारतर्फे श्रीमती शहा, सरकारी वकील**

१. आरोपी क्र. १ ते ६ यांना मी ओळखतो. मी शेती करतो. माझी शेती भोनगाव व बोंडगाव येथे आहे. माझ्या शेतीचा गट नं. १५० आहे. माझ्या वडीलांच्या शेतीचा गट नं. ५३८ व ५५८ आहे. माझ्या पत्नीच्या शेतीचा गट नं. १४३ आहे व माझ्या लहान भावाच्या शेतीचा गट नं. ३११ आहे. आमच्याकडे एकुण १० हेक्टर २ आर शेती आहे. आम्ही सर्व शेती एकत्रच वहीती करतो. आमच्या शेतीमध्ये सोयाबीन व हरभऱ्याचे पिक घेतले जाते. सन २०२३ मध्ये आम्हाला सोयाबीनचे २०० क्वींटल एवढे उत्पन्न मिळाले होते. आम्ही चऱ्याचे पिक ऑगष्टच्या नंतर पेरतो. दिनांक ०८.०५.२०२३ रोजी आमच्या शेतात झालेला १९० क्वींटल सोयाबीन राहुल चौधरी याला विकण्याचा सौदा केला होता. राहुल चौधरी माझ्या घरी आल्यामुळे त्यांच्याशी माझी ओळख झाली होती. माझ्यासोबत अजून गावातील भरपुर लोकांनी राहुल चौधरी याला माल दिला होता. सहा हजार रुपये प्रति क्वींटल असा दर आमच्या मालासाठी ठरला होता. दिनांक ०८.०५.२०२३ रोजी रवी बढे माझ्या घरी येवून माझ्या घरचा १९० क्वींटल २० किलो एवढे सोयाबीन ४०७ व आयशर या वाहनाने घेवून गेले होते. सोयाबीनची एकूण किंमत ११,४१,२००/– रुपये झाली होती. ४०७ व आयशर या वाहनाला नंबर नव्हता. ज्यावेळेस मी माल दिला होता त्यावेळेस राहुल चौधरी याने मला स्टेट बँकेचा धनादेश दिला होता. त्यावेळेस आता धनादेश घेवून टाका व ज्यावेळेस मी पैसे देणार त्यावेळेस माझा धनादेश परत कराल असे राहुल चौधरी याने मला म्हटले होते. माल द्यायच्या वेळेस राहुल चौधरी याने मला अग्रीम म्हणून रोख रक्कम दिली नव्हती. राहुल चौधरी याने मला दिलेल्या धनादेशाचा क्र. १५१९१९ व १५१९२० असा होता. धनादेश क्र. १५१९१९ हा ८,८०,२००/– रुपयाचा होता व त्या धनादेशाची तारीख ०८.०६.२०२३ अशी होती. धनादेश क्र. १५१९२० हा २,६१,०००/– रुपयाचा होता व धनादेशाची तारीख ०८.०६.२०२३ अशी होती. आरोपी राहुल चौधरी याच्या बँक खात्याचा क्रमांक मला माहित नाही. माझे खाते अॅक्सीस बँकेत आहे. राहुल चौधरी याने दिलेला धनादेश बँकेत जमा केला असता धनादेश पुरेशी रक्कम नसल्याने अनादरीत झाला. धनादेश अनादरीत झाल्याचा मेमो अॅक्सीस बँकेला दिला होता. मी राहुल चौधरी

यांच्यासोबतच व्यवहार केला होता. मी पोलीसांना सातबारा उतारा, अनादरीत झालेला धनादेश व बँक मेमो दिला होता. आता मला माझ्या शेतीचे तीन सातबारा उतारे दाखविण्यात आले. त्याला **निशाणी क्र. २६३ ते २६५** देण्यात येते. आता मला आरोपीने दिले धनादेशाची सत्यप्रत दाखविण्यात आली. तो धनादेश माझ्या नावाने असून त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र. २६६** देण्यात येते. आता मला बँकेने दिलेला मेमो दाखविण्यात आला. तो माझ्या नावाने आहे. त्याला **निशाणी क्र. २६७** देण्यात येते. आता मला दुसरा धनादेश दाखविण्यात आला. तो माझ्या वडीलांच्या नावाने आहे व त्यावर राहुल चौधरी याची सही आहे. तो धनादेश ८,८०,२००/- रुपयांचा आहे. त्या धनादेशाला **निशाणी क्र. २६८** देण्यात येते. आता मला बँकेचा मेमो दाखविण्यात आला. त्यावर माझी प्राप्तकर्ता म्हणून सही आहे. त्याला **निशाणी क्र. २६९** देण्यात येते. आता मला वजन काटा पट्टी दाखविण्यात आली. त्या दोन पट्ट्या मी पोलीसांना दिल्या होत्या. त्या दोन पट्ट्या माझ्या मालाच्या संदर्भात आहे. त्या दोन पट्ट्यांवर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र. २७० व २७१** देण्यात येते. राहुल चौधरी यांच्याकडून खेड्यापाड्याचा माल घेणे सुरु असल्यामुळे माझी त्याच्याशी ओळख झाली. त्यामुळे मी माझा मला राहुल चौधरी याला विकला होता. त्यावेळेस बाजारात सोयाबीनची किंमती पाच हजार रुपये प्रति क्वींटल होती व राहुल चौधरी याने आम्हाला सहा हजार रुपये प्रति क्वींटल असा सोयाबीनचा भाव दिला होता. आरोपी पळून गेले होते व त्यानंतर त्याने दिलला धनादेश अनादरीत झाला होता. आरोपीची मला जास्त पैसा देण्याची इच्छा नसल्यामुळे माझी फसवणुक झाली. आरोपी क्र. १ च्या व्यतिरिक्त आज सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत. मी सर्व आरोपींना ओळखतो.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र. १ व ५ तर्फे श्री. एस. व्ही. तेलगोटे यांचे मार्फत.**

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ५ हिला मी सदरची केस दाखल झाल्यानंतर ओळखायला लागलो होतो. मी पोलीसांना दिलेला जबाब वाचून बघितला होता. भोनगाव व बोंडगाव अशा दोन ठिकाणी आमची शेती असल्याचे मी पोलीसांना जबाब देतांना सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबामध्ये बोंडगावचे नाव नमुद नाही. माझे वडील, पत्नी व भाऊ यांच्या नावाने शेती असल्याचे मी पोलीसांना जबाब देतांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझी जमीन वडील, पत्नी व भावाच्या नावाने असल्याचे मी प्रथमच न्यायालयात सांगितले आहे. कोणाच्या नावावर कोणता शेत गट क्रमांक आहे हे मी पोलीसांना जबाब देतांना सांगितले नव्हते. २०० क्वींटल सोयाबीनचे उत्पादन सन २०२३ मध्ये झाल्याची बाब मी पोलीसांना जबाब देतांना सांगितली नव्हती. माझ्या जबाबात नमुद असलेला २२० क्वींटल सोयाबीन बरोबर आहे. यापूर्वी मी सन २०२३ मध्ये २०० क्वींटल सोयाबीनचे उत्पादन झाले होते असे सांगितले कारण की २०२३ पासून दोन तीन वर्ष झाले असल्यामुळे मला सोयाबीनचे उत्पादन निश्चित सांगता आले नाही. हे म्हणणे खरे आहे की,

राहुल चौधरी याच्या सोबत सोयाबीन प्रति क्वींटल सहा हजार रुपये प्रमाणे विकण्याचा सौदा झाल्याचे लेखी दस्तऐवज झाले नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्याने मला फक्त धनादेश दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, राहुल चौधरी याच्या सोबत प्रति क्वींटल सहा हजार रुपयाचा सौदा झाल्याबाबत माझ्या शब्दाव्यतिरिक्त मी कोणताही लेखी पुरावा पोलीसांना दिला नव्हता व पोलीसांनी सुध्दा मला लेखी पुरावा मागितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२३ पूर्वी राहुल चौधरी याच्यासोबत मी कोणताही आर्थिक व्यवहार केला नव्हता. सन २०२३ मध्ये सोयाबीनचा बाजार भावा पाच हजार रुपये प्रति क्वींटल असल्याची बाब मी पोलीसांना जबाब देतांना सांगितली होती. माझ्या जबाबात सदरची बाब का नमुद नाही याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. साक्षीदाराच्या जबाबामध्ये बाजार भावापेक्षा जास्त रक्कम तुम्हाला देणार असल्याचे नमुद आहे.

३. काटापट्टी आरोपी क्र. १ सोबत व्यवहार झाल्यानंतर करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, काटापट्टीवर ज्याचा माल असते त्याची सही असते व जो काटापट्टी करतो त्याची सुध्दा सही असते. हे म्हणणे खरे नाही की, काटापट्टीवर ज्या व्यक्तीच्या मालाची काटापट्टी केली असते त्या व्यक्तीचे नाव नमुद असते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. २७० वर माझी सही व नाव नमुद नसल्यामुळे ती काटापट्टी माझ्याच मालाची असल्याचे मी खोटे सांगत आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ ला १९० क्वींटल २० किलो सोयाबीन विकला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ ला १९ क्वींटल २० किलो सोयाबीन न विकल्यामुळे त्यासंदर्भात माझी व आरोपी क्र. १ ची कोणतीही लिखापडी झाली नव्हती. फिर्यादी अखिलेख शेळके माझा चुतण्या लागतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गावातील शेतकऱ्याचा हरभरा व सोयाबीन तुम्हाला देवू व त्याबदल्यात तुम्ही अग्रीम धनादेश द्या असे मी व फिर्यादी अखिलेख शेळके यांनी आरोपी राहुल चौधरीला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी धनादेश अग्रीम देण्याचे राहुलला सांगितले होते व ४५ दिवसांनंतर सोयाबीन व हरभरा आम्ही राहुलला देणार होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी अग्रीम धनादेश राहुल याच्याकडून प्राप्त केल्यानंतर त्याला सोयाबीन व हरभरा दिलाच नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने सोयाबीन घेतले म्हणून माझ्या व माझ्या वडीलांच्या नावाचा धनादेश आरोपी क्र. १ ने मला दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही अग्रीम धनादेश प्राप्त केल्यानंतर आरोपी क्र. १ ला माल न दिल्यामुळे अखिलेशने धनादेश वटवून घेण्याचे मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी धनादेश बँकेत जमा करण्यापूर्वी फिर्यादी अखिलेख याने आरोपी राहुल विरोधात केस केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ला माल दिलेला नसतांना आरोपी क्र. १ ला फसविण्याच्या उद्देशाने मी दोन्ही धनादेश बँकेत वटविण्याकरीता जमा केले होते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. २६६ व २६८ वर नमुद असलेल्या रक्कमेसाठी आरोपी क्र. १ ने माझी फसवणुक केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना खोटा जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ च्या विरोधात मी आज खोटी

साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आयशर व ४०७ वाहनामध्ये कोणताही माल न नेल्यामुळे मी पोलीसांना त्या वाहनांचा नोंदणीकृत क्रमांक सांगितला नव्हता.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**आरोपी क्र. ३ व ४ चे विधीज्ञ श्री. ए. पी. इंगळे यांनी उलटतपास नाकारला.**

**आरोपी क्र. २ व ६ चे विधीज्ञ श्री. जी. व्ही. पिसे व जी. एस. इंगळे हे गैरहजर. आरोपीने साक्षीदाराला काही विचारायचे नसल्याचे सांगितल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम) | (एन. डी. मेश्राम) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. २९.०४.२०२५ | दि. २९.०४.२०२५ |